महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर
( भरोसा सेल, अमरावती शहर )
कॅम्प रोड, अमरावती पीन कोड — ४४४६०२
दुरध्वनी :– ०७२१/२५५०१७५/e.mail-cp.amravati@mahapolice.gov.in


क्र:–भरोसा सेल /प्रेस नोट / आरोग्य तपासणी शिबिर/ /२०२५ अमरावती दि. ०६/०१/२०२५

**प्रेस नोट** **दि.०६/०१/२०२५**

''महाराष्ट्र पोलीस वर्धापण दिन'' २०२५ निमित्य दिनांक ०६/०१/२०२५ रोजी पोलीस आयुक्तालय अमरावती शहर तर्फे पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे व कुटुंबियां करिता आरोग्य तपासणी शिबिर, पोलीस मुख्यालय अमरावती शहर येथील कवायत मैदानवर मा.श्री.नविनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त, यांचे संकल्पनेतुन व श्री.गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त, परि-२, श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस उपायुक्त (मुख्यालय), श्री.सागर पाटील,पोलीस उपायुक्त परि-१, यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.

शहरातील १४ शासकिय व खाजगी हॉस्पिटल, सदर आरोग्य तपासणी शिबीरामध्ये सहभागी झाले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन मा.खासदार श्री.बळवंत वानखडे, मा.आमदार सौ.सुलभाताई खोडके, यांचे शुभहस्ते संपन्न झाले. उदघाटन कार्यक्रमास श्री.डॉ.दिलीप सौंदळे, जिल्हा शल्य चिकित्सक अमरावती, श्री.डॉ.अमोल नरोटे, वैद्यकिय अधिकारी, सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल, अमरावती, श्री.डॉ. योगेश सावदेकर, सुयश हॉस्पिटल अम. श्री.डॉ.आनंद काकाणी, श्रीमती डॉ.अरुणा काकाणी, श्री.पवन अग्रवाल, रेडियन्ट सुपर स्पेशालीटी अम., श्रीमती डॉ.संचिता देशमुख, पि.डिएम.एम.सी अमरावती, श्रीमती.डॉ.भावना सोनटक्के, श्री.डॉ.भुषण सगणे, श्री.डॉ.नितीन राठी, श्रीमती डॉ.मोनाली कळंबे, श्री.डॉ.अनिकेत पोटे, श्री.डॉ.चंद्रशेखर पाटील, श्रीमती डॉ.माधुरी अग्रवाल, श्री.डॉ.दिनेश वाघाडे, श्री. डॉ.योगेश झंवर, श्रीमती डॉ.मिनल देशमुख, श्री.डॉ.स्वप्निल शिरभाते असे उपस्थित होते.

पोलीस आयुक्तालय अमरावती शहर येथील पोलीस स्टेशन व शाखेमधील कामकाज करणारे असे एकुण ४११ पोलीस अधिकारी / अमंलदार व त्यांचे कुटुंबियांनी सदर आरोग्य शिबिरामध्ये ४८ वैद्यकिय तज्ञ व चमु यांचेकडुन ह्दय रोग, अस्थिरोग, किडनी रोग, स्त्रिरोग, बालरोग, त्वचा रोग, नेत्र विकार, दंत रोग, फुफ्सासबंधीचे आजार, कर्करोग, हॉर्मोन्स समस्या, नेत्र, मनोविकार, व्यसनमुक्ती, सिपिआर बाबत मार्गदर्शन, मेंदुविकार, बि.पी.शुगर, इ.सी.जी. इत्यादीची तपासणी व रोग निदान करुन घेण्यात आले. ड्रगीस्ट असो. अमरावती यांचेकडुन औषध वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमा मध्ये मा.खासदार श्री.बळवंत वानखडे यांनी पोलीसांवर असलेली जबाबदारी व येणारा ताण या विषयावर मार्गदर्शन केले व सर्वांनी आरोग्य तपासणी करुन वेळी वेळी रोग निदान करुन उपचार करण्याचे आवाहन केले. मा.आमदार सौ.सुलभाताई खोडके यांनी शिबीराची पाहणी करुन आरोग्याची काळजी करण्या बाबत मार्गदर्शन केले. मा.पोलीस आयुक्त यांनी देखील पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी स्वता: चे व परिवाराचे आरोग्य आबाधित राखण्या करीता नियमित तपासणी करुन उपचार करणे गरजेचे असल्याचे सांगीतले. त्यानंतर आरोग्य तपासणी शिबीरामधील सर्व सहभागी तज्ञ डॉक्टर व त्यांचे सहकारी यांना मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे हस्ते प्रशस्ती पत्र देवुन गौरविण्यात आले.

**पत्रकार दिनाचे** औचित्य साधुन श्री.नविनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी सर्व पत्रकार बंधुना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला उपस्थित पत्रकारां पैकी श्री.नासिर हुसेन, श्री.पवन श्रीवास्तव, वैशाली बैस, सुनिल तडोकार, विक्रम ढोके, राजेश घोरमाडे,श्री.प्रणव, श्री.त्रिदिप वानखडे, इत्यांदीचे प्रतिकात्मक स्वरुपात पुष्पगुच्छ देवुन स्वागत करण्यात आले.

पोलीस निरीक्षक
भरोसा सेल, अमरावती शहर